REIKI VIDYA NIKETAN
सर्वेः सन्तु निरामयाः

रेकि ब्रह्म

वर्ष ८वे अंक ९वा । जून २०२०

षट् रंगाच्या छटा उधळल्या ।
आत्मारामी शरण जाहल्या ॥

मंद सुगंधी श्वास दरवळे ।
लख्ख प्रकाशांचे सोहळे ॥

आत्मप्रसादी चित्त प्रकाशले ।
अंतरपूजनी विश्व सामावले ॥

नकारात्मकतेशी नाते–गोते...

नुकतेच आपले एक ऑन–लाईन सात दिवसांचे ध्यान शिबिर झाले. त्यातील एक ध्यान अंतर्पूजनाचे किंवा आत्मपूजनाचे होते. त्या ध्यानानंतर बऱ्याच साधकांनी दुसऱ्या दिवशी माझ्याशी संपर्क साधला आणि मला सांगितले कि ह्या ध्यानानंतर त्यांना खूप उदासिनता आली. आपल्यातील काहीतरी महत्वाचे निघून गेले असे वाटले. एखादे जवळचे माणूस आयुष्यातून निघून गेल्यानंतर जी एक बेचैन अवस्था होते, दु:ख होते तसेच काहीसे. अगदी एक पोकळी आयुष्यात निर्माण झाल्याचा आभास झाला. असे का व्हावे असा त्यांचा प्रश्न होता.

मला हे सारे अपेक्षित होते. कारण त्या ध्यानाचा उद्देशच तो होता. सगळ्या चक्रांमधल्या नकारात्मकता काढून टाकून त्या आत्म्याला समर्पित व्हायचे हा त्याचा संकल्पच होता. समाधिच्या अगदी एक जवळची अवस्था साधण्याचा तो प्रयत्न होता. साहजिकच जेवढया नकारात्मकता आपण आयुष्यात संस्कारांच्या रूपामध्ये आपल्या अस्तित्वात जमा केल्या होत्या त्या काढणे आणि स्वत:ला सकारात्मकतेने भरून टाकणे हे अंतिम लक्ष्य ठेवूनच तर साधना केली जाते. परंतु जेव्हा ही वेळ येते तेव्हा लक्षात येते कि आपल्यातील नकारात्मकता सुद्धा आपल्याच व्यक्तिमत्वाचा भाग बनून राहिलेल्या असतात. वर्षानुवर्षे आणि कदाचित जन्मोजन्मी ज्या नकारात्मकता घेऊन आपण जगत असतो त्या आपल्या नकळत आपल्याशी सलगी करत असतात. आपल्याला त्यांची सवय झालेली असते. कोठेतरी त्या नकारात्मकता आणि आपले संस्कार यांच्याशी असे घट्ट नाते जुडलेले असते कि त्यांचे जाणे सुद्धा आपल्याला भीषण वाटते. आपण आपल्याला त्या सगळ्या नकारात्मक गोष्टींशी संलग्न करूनच जगत असतो. तीच आपली ओळख झालेली असते. असे वाटायला लागते कि आपली ओळखच निघून गेली. आपले अस्तित्वच धोक्यात आले.

प्रत्यक्ष अर्जुनाचे सुद्धा कुरूक्षेत्राच्या रणांगणावर हेच झाले होते ना? समोरचे योद्धे पाहून हे आपले नातेवाईक आहेत आणि यांच्याद्वारेच माझी ओळख असते, यांच्यामधूनच माझे अस्तित्व बनलेले आहे ही जाणिव त्या क्षणाला झाली. अधर्माच्या बाजूने उभे असलेले योद्धे हे आपल्याच अस्तित्वाचे भाग आहेत हे त्याला जाणवले. त्यांना मारणे म्हणजे आपलेच अस्तित्व मिटवणे आहे असे त्याला वाटायला लागले. म्हणून मग त्याने भगवान श्री कृष्णांना सांगितले की यांचा मृत्यु झाला तर मग मी कसे जगायचे आणि त्या जगण्याला अर्थ तरी काय राहणार? जीवनाचा रसच निघून जाणार. ज्यावेळेला आपल्या नकारात्मकता आपल्याला आपल्याच अस्तित्वाचा अविभाज्य भाग वाटायला लागतात त्यावेळेला मग असे वाटायला लागते कि असू दे कि आपल्या नकारात्मकता आपल्याबरोबर. कारण आपले नाते जुळलेले असते त्यांच्या बरोबर. आपण आपल्याच दुबळेपणाशी घट्ट नाते जुळवून असतो. आपल्याच संस्कारांना सोडायला तयार होत नसतो. आपल्याच अस्तित्वाला मिटवणे आपल्याला आपल्या मृत्यु एवढाच भयानक वाटतो. मग आपल्याच दोषांना आपण कवटाळून त्यांच्यासाठी टाहो फोडतो. आपल्याला आपल्याच दोषांबद्दल प्रचंड प्रेम वाटायला लागते. ज्याक्षणी आपण जिंकत असतो त्याचक्षणी मग आपल्या पराभवाची सुरूवात होत असते.

साधनेचे उद्धीष्टच मुळी या सगळ्या नकारात्मकतेचा अंत करणे असते. परंतु वेळ येताच प्रत्येक साधकातील अर्जुन जागा होतो. त्याला आपल्याच अस्तित्वाची नवी ओळख व्हायला सुरूवात होत असते. जे चुकीचे, दोषयुक्त वाटत असते तेच त्याला मग हवेहवेसे वाटते. परमात्मा प्रसाद वाटायला तयार असताना मग हातातील चिखल टाकायची त्याला भीति वाटते. हातातील त्या चिखलाला संभाळता संभाळता त्या चिखलाशी कधी आणि कसे नाते जोडले गेले हे त्यालाच समजत नाही. मग त्याला सकारात्मकतेचा प्रसाद अनोळखी वाटायला लागतो. या प्रसादाची त्याला भीति वाटते. मग अर्जुनासारखाच त्याचा ह्या सगळ्या अधर्माचे, असत्याचे, दु:खाचे समर्थन तो करू लागतो. मोक्षाच्या, समाधिच्या स्वप्नांना सामोरे जाणारा साधक अचानक बिथरतो आणि त्याला मोक्षाच्या स्वप्नांची पूर्तता भेडसावयला लावते.

एकच आनंदाची गोष्ट म्हणजे अशा अवस्थेत अर्जुन श्रीकृष्णांना शरण गेला आणि परमात्म्याच्या त्या दिव्य गीताने त्याला योग्य मार्ग मिळाला. कृष्णाला शरण जाण्याशिवाय त्या रणक्षेत्रातून पळून जायची संधी आणि पर्याय त्यालाही होता की!

प्रेम, प्रकाश आणि रेकि सह
अजित सर
२५ मे २०२०

गुरूचरित्र – मला समजले तसे

श्री प्रविण कुळकर्णी, ठाणे

भक्तीकांड अध्याय ५१वा

मागच्या अध्यायात सदगुरुंच्या वा महानुभावांच्या सहवासाने कसे संसारातील व्याधीचे निराकरण होते ते पाहिले. आता या अध्यायी श्रीगुरु आपले अवतार कार्य संपवून लौकीकार्थाने श्रीशैलयात्रेस जातात, पण अव्यक्त स्वरुपात, सदभक्तांना तारण्यासाठी गाणगापुरी नि:संशय अखंड वास करत आहेत हे श्रीगुरुमुखातले बोल सांगणारी कथा आली आहे.

कलीयुगात मोक्षार्थी कमी व अर्थार्थींचा सुकाळ असतो म्हणून श्रीगुरु गुप्त होण्याचा संकल्प सोडतात.सर्व गाणगापूरवासी, शिष्यगण, भक्तगण हळहळतात. ते म्हणतात की तू आमचा आश्रय आहेस, आमची मातापिता आहेस, आमचा असा अव्हेर करू नकोस. तू भक्तजनांची कामधेनु आहेस. श्रीगुरु त्यांना सांगतात की चिंता करू नका.आम्ही गाणगापुरातच आहोत.अमरजा संगमात नित्य स्नान, व मठामध्ये आमचा अखंड निवास आहे.जे माझे सतत निरंतर ध्यान करतात व ज्ञानी आहेत, त्यांना आम्ही प्रत्यक्ष दिसतो, पण जे अज्ञानी आहेत, त्यांच्यासाठी आम्ही लौकीकार्थाने श्रीशैलयात्रेला जात आहोत. कर्नाटक प्रतीत याच्यानंतर काही ओव्या आहेत त्या महत्वाच्या वाटल्या म्हणून त्याचा भावार्थ खाली देत आहे.प्रलयकाळचे उदक ज्याप्रमाणे सर्व सृष्टीमध्ये नभोमंडळापर्यंत व्यापलेले आहे, त्याप्रमाणेच, हे सर्व विश्व आत्म्याने व्यापले आहे, तेथे मी करावयाचे काय? जावयाचे कोठे? घ्यायचे काय? आणि टाकायचे काय? याप्रमाणे, अखंड धारणा ज्याच्या अंतरात स्फूरत आहे, त्यास आम्ही प्रत्यक्ष दर्शन देऊ यात संशय धरु नका, असे भगवान सांगतात. (अवधूत गीतेतला श्लोक असावा) यातून श्रीगुरु असे सुचवतात की आपली वृत्ती जी देहापुरती मर्यादित आहे, ती वृती वाढवून ब्रह्मांडभर व्यापक करायची. (स्वार्थी वृत्तीने काम न करता समाजाची, राष्ट्राची उन्नत्ती होईल अशी कार्ये करावी. मी व माझे हा भाव त्याज्य आहे.) असे केल्याने साडेतीन हात देह आहे तोच मी अशी जी देहात्मबुध्दी आता स्फूरत आहे ती नाहीशी होऊन अनंत ब्रह्मांडाला व्यापून असणारे चैतन्यच आपण आहोत असा निश्चय होईल व प्रतीतिही येईल. श्रीसमर्थ दासबोधात सांगतात (९/९)की आपण भ्रमात राहून देहधारीच राहीलो म्हणजे आपली देहात्मबुध्दीच राहीली तर आपण ब्रह्मांडाला कसे जाणणार? म्हणून संकुचित वृत्ती एव्हढी व्यापक करावी की वृत्तीचा लोप होऊन ती ब्रह्माकार होईल व शेवटी ब्रह्माकार वृत्ती गळून जीव ब्रह्ममय होईल. एकनाथ महाराज म्हणतात (ए.भा. अ. ११) देश, काळ व वेळ हे सदा सर्वदा अशाश्वत आहे, तुटणारे आहे, सर्वांच्यात जो आत्मा आहे तो, सच्चिदानंदघन, अभेद, सत्यं ज्ञानं अनंतं परब्रह्मस्वरुप अद्वय व एकमेव आहे असे जाणून जे मला भजतात तेच खरे भगवतधर्मी आहे. श्रीतुकोबाराय म्हणतात की ज्याने हे विश्व एक परमात्मस्वरुप आहे असा अनुभव केला आहे त्यांच्याजवळच परमात्मा वास करतो.त्याच्या दर्शनाने पापनाश होतो. ज्ञानेश्वरांचे भाष्य वरील अवधूत गीतेतल्या संस्कृत श्लोकावरचेच भाष्य आहे.यातून हेच लक्षात येते की परमात्म्याचे साक्षात दर्शन ही

अत्युच्चतमकोटीतला अनुभव आहे, हे येरागबाळ्याचे काम नाही, त्यासाठी तेव्हढी तीव्र तळमळ, साधना, व त्यागाची पराकाष्ठा करावी लागते.

श्रीगुरु भक्तांना सांगत आहेत की आम्ही कृष्णातीरी– पंचनदी संगमावर नरसोबाच्या वाडीत, प्रात:स्नान व अनुष्ठान करतो. माध्यान्ही भीमा–अमरजा संगमी गाणगापुरात स्नान करून मठात पुजा स्विकारतो. काहीही मनामध्ये शंका धरु नका. आम्ही त्रिवार सांगतो की आम्ही गाणगापुरातच वस्ती करून आहोत, जे लोक भक्ती करतात, त्यांच्यावर आम्ही प्रेम करतो, त्यांच्या मन:कामना पुर्ण करतो हे आमचे सिध्द वाक्य आहे. संगमावर जो अश्वत्थ आहे, तो प्रत्यक्ष कल्पवृक्ष आहे, ज्याची ज्याची अपेक्षा ठेऊन तुम्ही त्याची पुजा कराल, त्याची पुर्ती त्वरीत होईल. या कल्पवृक्षाची पुजा करून मग आमच्या निर्गुण पादुका ठेवलेल्या स्थानी यावे. विघ्नहर्त्या चिंतामणीचे पूजन करावे.तो समस्त विघ्नांचा अंत करतो. नंतर अष्टतीर्थे आहेत, त्यांची मनोभावे अर्चना करावी. आम्हाला अत्यंत प्रिय असणारी आरती तिन्ही त्रिकाळ करावी.

असे सांगून श्रीगुरु श्रीशैल्ययात्रेला निघतात.भक्त मठात परत येतात तर तेथे श्रीगुरुंचे दर्शन सर्वांना होते. लोक विस्मित होऊन परब्रह्मस्वरुप श्रीगुरुंचे स्मरण करतात व म्हणतात याला जे मनुष्य म्हणतात ते यमाच्या द्वारी जातील. भक्तांना दृष्टांत दाखवून श्रीगुरु श्रीशैल्यपर्वताच्या पायथ्याशी पाताळगंगा नदीच्या किनारी आले. पैलतीरी जाऊन मल्लीकार्जुनाशी ऐक्य पावण्यासाठी ते शिष्यांना फुलांचे आसन आणायला सांगतात. त्याप्रमाणे, शिष्य केळीची पाने गुंडाळून शेवंती, कमळ, कल्हार व मालतीच्या फुलांनी फारच शोभिवंत केलेले आसन बनवतात. श्रीगुरु शिष्यांना त्यांच्या गावी जाण्यास सांगतात.आम्ही तुमच्या घरीसुध्दा वास करतो अशी मनाशी पक्की खूणगाठ बांधा असे भक्तांना संबोधून श्रीगुरु कन्याराशीत गुरु असतांना, बहुधान्य संवत्सरात, उत्तरायणात, शिशिर ऋतुत, माघ कृष्ण पक्ष प्रतिपदेला, शुक्रवारी निजानंदी गमन करण्यास पुष्पासनावर बसले व शिष्यांना म्हणाले की आम्ही निजधामाला पोहोचल्यावर तुम्हांला प्रसादपुष्पे पाठवू.ती तुम्ही अखंड पूजेत ठेवावी. तुमच्या घरी लक्ष्मी वास करील. गायन करत माझे स्मरण करावे. माझे भजन कीर्तनावर खुप प्रेम आहे. ज्यांच्या घरी भजन, कीर्तन, गायन नेहमी चालते, त्यांच्या घरी मी निरंतर वास करतो. त्यांच्या घरी रोगराई नसते, त्यांना पुत्र–पौत्र, लक्ष्मी, ऐश्वर्य, दीर्घायुष्य प्राप्त होते. माझे चरित्र वाचन श्रवण करणाऱ्यांवर लक्ष्मी प्रसन्न होते. असे सांगून श्रीगुरु अदृष्य झाले.काही वेळानी प्रसादाची चार फुले आली.ती सिध्द सरस्वती, सायंदेव, व दोन कवी नंदी व नरहरी यांनी वाटून घेतली. असे म्हणून सिध्द सरस्वती आपल्याजवळील फूल नामधारकाला दाखवतो.असा गुरुचरित्र महिमा आहे. ही कामधेनु आहे. असे पवित्र पुस्तक जे लिहितात, वाचतात, ते चारही पुरुषार्थ प्राप्त करतात.नामधारक सुध्दा लक्ष्मीवंत झाला. पुत्र– पौत्रादि सुख व शतायुषी आयुष्य प्राप्त करता झाला.

सरस्वती गंगाधर सर्व श्रोत्यांना नमस्कार करून विनंती करतो की हे परमकथामृत तुम्ही नेहमी वाचन/श्रवण करत रहा व श्रीगुरु दत्तात्रयांची कृपा संपादन करा. असा हा श्रीगुरुनिजानंदगमनाचा शेवटचा अध्याय समाप्त झाला.ही सेवा श्रीगुरु दत्तात्रयांच्या चरणी सादर समर्पण. ॥ॐ तत्सत श्री:॥

शके १८६० साली श्री. रामचंद्र कृष्ण कामत यांनी सायंदेव साखऱ्यांच्या कुळातील सरस्वती गंगाधर यांनी लिहिलेल्या गुरुचरित्राची संशोधन सेवा माशैली दुर्गादत्तमंदिरी पुर्ण केली.या पुढील अध्यायी अध्यायवार कथांचा सक्षेप–सार – अवतरणिका– बघून या ग्रंथाची सांगता करू.

संपूर्ण श्री गुरूचरित्रातील हा अध्याय भावव्याकुळ करणारा. प्रत्यक्ष श्री गुरूंचा सदेह अवतार येथे समाप्त होतो आणि भक्तांच्या हृदयात एकच कल्लोळ उठतो. सातत्याने ५० कथा श्रवण करून मनाला आलेली एक धुंदी येथे एका क्षणात हृदय रसात विलीन होऊन जाते. परंतु एखाद्या लहान मुलाला आईने समजावून सांगावे तसे ही गुरूमाऊली सुध्दा आपल्या भक्तांना विश्वास देऊन जाते कि मी तुम्हाला सोडून कोठेच गेलेलो नाही. माझा देह जरी तुम्हाला दिसला नाही तरीही माझा वास विश्वाच्या कणाकणात आहे.

॥श्री अवधूत चिंतन गुरुदेव दत्त॥

चैतन्याचे धुमारे

शब्द

‘शब्द’ हा डोहावरचा तरंग
पण जाणून घ्यावे, डोहाचे अंतरंग

‘शब्द’ हे बहरलेलं झाड
पण ‘पंचतत्वांची’ ठेवावी चाड

‘शब्द’ हा चाफ्याचा सुगंध
मातीच्या गर्भातून उमटलेला मृद्‌गंध

‘शब्द’ अंबरात विहरणारा पक्षी
अंबराचा वेध घ्यावा, सूर्य आहे साक्षी

‘शब्द’ सरसर येणारी सागराची लाट
कोणती खळबळ माजविते लाटांनी भरतो काठ

‘शब्द’ हा पेटलेला अग्नी
पेटलेला की पेटविलेला भडाग्नी?

‘शब्द’ हे कडू कारले
पण पचविले, त्याचे दोष सरले

‘शब्द’ एक मुक गुढ चित्र
उलगडण्यात सरले आयुष्याचे सत्र

‘शब्द’ ही दुधावरची साय
डोक्यावरून हात फिरविणारी, हीच तर माझी माय

‘शब्द’ हे नादब्रम्ह
सरस्वतीची लेकरे आत्ममग्न

‘शब्द’ हे व्यक्त होण्याचे साधन
‘अव्यक्ताच्या अतीत’ त्याचे करावे आराधन

श्रीमती अनुराधा चौधरी, पुणे.

यशाकडे घेऊन जाणारे अपयश

तेजश्री रानडे, देवगड

मित्रांनो जर कोणी असं म्हटलं की, "अपयश हे यशाकडे घेऊन जातं." तर आपण नक्कीच असं म्हणू की, "असं कसं?" परंतु आपण कधी विचार केला आहे का की मुळात हे अपयश का येतं? त्याच उत्तर आहे त्यामागे असलेल्या भीतीमुळे. बरेचदा आपण अपयश येईल म्हणून प्रयत्नच करत नाही. यश मिळविण्यासाठी प्रयत्नांची गरज असते हे आपण विसरतो आणि मग अपयश आलं की खचून जातो, रडत बसतो.

मित्रांनो समाजात कितीतरी यशस्वी माणसांची उदाहरणं आपल्याला पाहायला मिळतात. जसं की मास्टर ब्लास्टर सचिन तेंडूलकर, ज्यांना गानकोकिळा असं म्हटलं जातं त्या लता मंगेशकर किंवा ज्यांनी शून्यातून विश्व निर्माण केलं ते यशस्वी उद्योजक रतन टाटा आणि अशी कितीतरी माणसं असतील की जी यशाच्या उत्तुंग शिखरावर पोहोचली. परंतु त्यांच्या आयुष्यात कधीच अपयश आलं नसेल का? तर असं नाही. त्यांनाही कितीतरी अपयशांना सामोरं जावं लागलं. पण अपयश आलं म्हणून तिथेच न थांबता ही सारी माणसं नेटाने पुढे जात राहिली. प्रयत्न करत राहिली आणि एक दिवस यशापर्यंत पोहोचली. अपयश येऊनही अखेर त्यांना यश कसं बर मिळालं असेल? तर त्यामागचं मुख्य कारण आहे, अपयशाकडे पाहाण्याचा त्यांचा 'सकारात्मक दृष्टिकोन'. सकारात्मक दृष्टीने जर अपयशाकडे पाहिलं तर हेच अपयश सांगतं की यशाकडे कसं जायचं.

हेच आपण एका छोटयाशा गोष्टीतून समजून घेऊया. तर झालं असं की एकदा एका मुलीला परीक्षेत फार कमी मार्क मिळाले. एवढे कमी की ती केवळ काठावर पास झाली. तिच्या मित्र–मैत्रिणींनी तिची चेष्टा केली, खिल्ली उडवली. तिला रडूचं कोसळलं. असं वाटलं की यापुढे आपल्याला काहीच जमणार नाही. ती खचून गेली. मग तिच्या मोठ्या बहिणीने तिला समजावून सांगितले, "बाळा, असं रडत बसुन पुढे जाता येत नाही बरं. अपयश आलयं खरं पण ते का आलं? आपण कोठे चुकलो? हे शोधून काढायला हवं ना? हे एकदा शोधून काढलसं की हेच अपयश तूला यशाकडे घेऊन जाईल." यावर त्या मुलीने विचार केला. तेव्हा तिचच तिला कळलं की अपयश येईल म्हणून आपण घाबरत होतो. क्षमता असूनही पूर्ण प्रयत्न करत नव्हतो. मग आपल्या दोषांवर मात करत ती पुढे जात राहिली आणि एक दिवस डॉक्टर झाली. सेवाभावाने काम करू लागली. हे केव्हा शक्य झालं जेव्हा तिने आपल्या अपयशाकडे सकारात्मक दृष्टीने पाहिलं तेव्हा.

मित्रांनो अपयश आलं म्हणून शक्तिहीन होण्यापेक्षा पुन्हा नव्या जोमाने अपयशावर मात करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. तरच अशक्यही शक्य होऊ शकतं. हे आपण अजून एका प्रसंगातून समजून घेऊया. ही गोष्ट आहे १९८९ सालची. भारत– पाकिस्तान सामना सुरु होता. भारत जवळजवळ हरण्याच्या सीमेवर उभा होता. पाकिस्तानच्या सुनामीप्रमाणे धावणाऱ्या वेगवान गोलंदाजामुळे भारतिय फलंदाजांचा टिकावच लागत नव्हता. मोठे–मोठे रथी–महारथी बाद होऊन परतले होते. अशात एक सोळा वर्षांचा फलंदाज खेळायला उतरला. एवढ्याश्या वयात हा मुलगा कसा टिकून राहाणार? त्याला जमेल का? अशी शंका बऱ्याच लोकांच्या मनात होती आणि पहिल्या चेंडूनंतर ती शंका खरी ठरणार असंच चित्र होतं कारण त्या वेगवान चेडूंमुळे तो सोळा वर्षांचा फलंदाज जखमी झाला. साऱ्यांनीच त्याला पुन्हा परतण्याचा सल्ला दिला. तो पुढे खेळणार नाही हे जवळजवळ निश्चित झालं होतं. एवढयात काहीसा विचार करुन तो तरूण फलंदाज म्हणाला, "मी खेळणार, निश्चित खेळणार." त्याच्या बोलण्यात आत्मविश्वास होता आणि खरच त्या फलंदाजाने आपल्या सहकारी फलंदाजाबरोबर उत्तम भागिदारी करत आपल्या उत्कृष्ट फलंदाजीचं प्रदर्शन केलं. साऱ्या प्रेक्षकांनी एकच कल्लोळ केला "सचिन.. सचिन.." मित्रांनो तुम्हाला कळलचं असेल तो सोळा वर्षाचा तरूण फलंदाज कोण होता ते. आपल्या सर्वांचा लाडका भारतरत्न मास्टर ब्लास्टर सचिन तेंडूलकर. आता त्यावेळी त्याने हार मानली असती तर 'शतकांचंही शतक' असा विश्वविक्रम करणारा सचिन तेंडूलकर जन्माला आला नसता कदाचित.

यातून आपण हेच शिकलं पाहिजे की एक अपयश आलं म्हणून पुढे अपयशच येणार असा विचार न करता प्रयत्न करत राहिले पाहिजेत आणि बरं का स्वत:वर विश्वास असेल आणि त्या विश्वासाला प्रयत्नांची जोड असेल तर आलेल्या अपयशातूनही यशाची वाट दिसते आणि मग गरज उरते ती त्या वाटेवरून निष्ठेने चालत राहाण्याची. मग यश मिळविण्यासाठी वेळ तो कितीसा लागणार.

अग्निहोत्र आणि कॉरॉना व्हायरस

(डॉ. उलरिख बर्क यांच्या लेखाचे भाषांतर)

सध्या कॉरॉना व्हायरसच्या तुफानामध्ये आधुनिक जीवन आणि आधुनिक (तथाकथित) विज्ञान या दोन गोष्टीं गवताच्या काड्यांसारखे हवेत इतस्तत: गटांगळ्या खात आहेत हे सगळ्या जगाच्या नजरेसमोर आले आहे. सगळीच शास्त्रे आणि तत्वज्ञाने डळमळीत होत असताना अग्निहोत्रासारखे एक शास्त्र मात्र अथांग समुद्राच्या घाबरवणाऱ्या विक्राळ लाटांत हरवलेल्या मानवी जीवनाच्या तारूला दीपस्तंभासारखे मार्गदर्शन करायला सज्ज झाले आहे. आजच्या ह्या कॉरॉनाव्हायरसच्या मस्तवाल बैलाला वेसण घालण्याला अग्निहोत्रासारखे पारंपारिक विज्ञान समर्थ आहे का हा प्रश्न सर्वच अग्निहोत्र करणाऱ्या साधकांना पडतो आहे. त्यानिमित्ताने अग्निहोत्राच्या परंपरेतील एक ज्येष्ठ वैज्ञानिक डॉ उलरिख बर्क यांच्या इंग्रजी लेखाचा हा अनुवाद.

प्रस्तावना:

कोविड १९ ह्या कॉरॉना व्हायरसने जगभर माजवलेल्या उत्पाताने प्रत्येकजणच हैराण आहे हे निश्चित. एकमेकांपासून दूर राहणे, वारंवार हात धुणे अशा काही प्रकारांनी आपण निदान ह्या व्हायरसचा संसर्ग टाळू शकतो. आणखी आपण काय करू शकतो? जरी आपल्याकडे असा कोणताही ठोस वैज्ञानिक पुरावा नाही (कारण हा व्हायरसच नव्याने आलाय) तरीही पारंपारिक वेदिक असलेला अग्निहोत्र यज्ञ वातावरण शुद्ध करतो हे साधारण सर्वांनाच ज्ञात आहे आणि त्याचा उपयोग हे संकट दूर करू शकतो असा कयास आहे. अग्निहोत्र उपचार तीन प्रकारे यात आपल्याला मदत करू शकते ते पुढील प्रमाणे:

१. संसर्ग होण्याची शक्यता कमी करणे

२. संसर्गासाठी आवश्यक असलेल्या वातावरणावर काबू पाळून कोविड १९ चा प्रभाव कमी करणे

३. संसर्ग सहन करण्यासाठी शरीराचे सशक्तीकरण करणे

१) संसर्ग होण्याची शक्यता कमी करणे

कॉरॉना व्हायरसचा संसर्ग होऊ नये म्हणून अग्निहोत्राचा उपयोग कसा करता येईल यासाठी एक छान अनुभव आता जगात आलेला आहे. स्पेन देशातील माद्रीद या शहरात राहणाऱ्या एलिझाबेथ एम. यांचा हा स्वत:चा अनुभव खूप बोलका आहे. इटालीच्या कुशीत असलेल्या या देशात आतापर्यंत साधारण ४०००च्या वरती लोक या रोगाला बळी पडले आहेत. एलिझाबेथ आपल्या सोबत्यासमवेत माद्रीद शहरात एका घरात राहतात त्याच घरातील एक खोली त्यांनी एका भाडेकरूला भाड्याने दिली. त्या भाडेकरूचे स्वत:चे एक हॉटेल आहे तेथे नेहमी च लोकांची वर्दळ असते. अर्थातच त्या माणसाचा जनसंपर्क मोठा आहे. त्या माणसाला कोविडची बाधा झाली आहे हे पक्के झाले आणि साहाजिकच एलिझाबेथ ताईंचे व त्यांच्या सोबत्याचे धाबे दणाणले. त्यांनी आपापल्या चाचण्या करून घेतल्या त्यामात्र सामान्य आल्या. आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्या माणसाबरोबर ह्या दोघांची उठबस असायची. एकाच माजघरात वावरायचे. एकत्र जेवायचे, एकाच स्नानगृहाचा वापर व्हायचा. त्यांच्या चांचण्यांच्या निकालांनी डॉक्टरही हैराण झाले. परंतु त्यांच्याही ध्यानात आले कि एलिझाबेथ अगदी न चुकता घरात अग्निहोत्र करायच्या, अग्निहोत्राचे भस्म खायच्या. हे कसे शक्य झाले?

हे पाहण्याच्या आधी कॉरॉनाचा संसर्ग कसा होतो हेही पाहणे आवश्यक ठरते. हा संसर्ग तीन प्रकारांनी सामान्यत: होऊ शकतो.

१. दरवाजे, त्यांच्या कड्या वगैरेंना स्पर्श होणे: ह्यांवरती हा व्हायरस साधारण दोनेक तास टिकतो. (धातूंवर १० किंवा अधिक तास, कपड्यावरती ६ तास इत्यादि)

२. एखाद्या रूग्णाच्या श्वासातून हवेत येणाऱ्या बाष्पबिंदूंमधून जसे खोकला, शिंक इ. (हवेत हा व्हायरस साधारण काही मिनिटेच टिकतो त्यामुळे अंतर पाळल्याने हे टळू शकते)

३. अतिसूक्ष्म अशा हवेतील बाष्पबिंदूंमधून बराच वेळ हा राहू शकतो.

जपानच्या सांसर्गजन्य रोगांचे संशोधन करणाऱ्या संस्थेचे अध्यक्ष व टोहो विद्यापीठातील मायक्रोबायॉल्जी विभागातील प्राध्यापक श्री काझुहिरो टाटेडा यांनी हे मान्य केले आहे कि अगदी शिंक किंवा खोकला न येता सुद्धा केवळ एकमेकांच्या जवळ येण्याने हा रोग पसरू शकतो.

अजूनपर्यंत अग्निहोत्राने व्हायरसची संख्या कमी होऊ शकते का याविषयी अजूनही काही खास संशोधन झालेले नाही. परंतु वरीलपैकी २ व ३ ह्या विषयांवर झालेल्या संशोधनाअंती बऱ्याचश्या विद्यापीठांनी हे सिद्ध केले आहे कि अग्निहोत्राच्या उपयोगाने वातावरणातील जंतू किंवा बॅक्टेरिया कमी होऊ शकतात. कदाचित हे विषाणूंनाही लागू पडते का? ह्यावर जेवढ्या लवकर संशोधन होईल तेवढे बरे. वातावरणातील जंतूचे प्रमाण कमी झाल्याचे काही प्रयोग खालील प्रमाणे:

नुकताच पुण्यातील फर्ग्युसन कॉलेजमध्ये हा प्रयोग केला गेला. माध्यम असलेल्या छोट्या आकाराच्या बश्या अग्निहोत्राच्या आधी आणि नंतर कक्षामध्ये उघड्या ठेवल्या गेल्या. त्यांत जंतूची वाढ करण्यात आली.



अग्निहोत्रा आधी



अग्निहोत्रा नंतर

निष्कर्ष: अग्निहोत्राच्या धुराने हवेतील मायक्रोब्जचे प्रमाण कमी झाले.

बेलाच्या झाडावर रेकिने झालेला परिणाम..

विणा सावंत, राजापूर

माझ्याकडील असलेले बेलाचे झाड पूर्णपणे सुकून गेले होते. काही ठीकाणी उंदरांनी कुरतडलेलेही होते. मी पूर्ण इच्छाशक्तीच्या जोरावर दररोज सकाळी १० मिनिटे बेलाच्या झाडाला रेकि देत होते. रेकिचा चांगला परिणाम होणार हा विश्वास होताच आज १५ दिवसांनी खूप चांगले परिणाम दिसत आहेत. जे झाड मी उपटून फेकून देणार होते ते पुनर्जिवित झालेले बघून खूप आनंद होत आहे.

(लेखांक ९)

जाहल्या स्वामीराज वैद्य, व्याधी पळे आपणची...

असाध्य रोग केवळ तीर्थाने बरा झाला.

साधारण १८६१ साली जगन्नाथरावांना पायाच्या दुखण्याचा त्रास बळावला. त्याआधी साडेतीन वर्षे त्यांना ही पीडा दररोज जाणवत होती. त्याकाळात बऱ्याचश्या डॉक्टरांना त्यांनी आपली पीडा सांगितली होती. जे जे काही डॉक्टरांनी सांगितले ती औषध आणि उपाय करुन ते थकले.पण एकाही औषधाचा आणि डॉक्टरांचा उपयोग झाला नाही. शेवटी सगळ्याच डॉक्टरांनी त्यांना दोनही पाय कापावे लागतील असे ठामपणे सांगितले. परंतु हा भयंकर उपाय करण्यावाचून आता गत्यंतर नाही हे लक्षात आल्याने जगन्नाथरावांना प्रचंड भय वाटू लागले.त्यांनी आपल्या काही मित्रांना हे भय बोलून दाखवले.त्यांच्या एका प्रिय मित्राने त्यांना सांगितले की अक्क्लकोटात श्री स्वामी समर्थ महाराज आहेत आणि ते समस्त व्याधीग्रस्तींच्या व्याधी दूर करतात. हे ऐकून कधी एकदा स्वामींच्या दर्शनाला जातो अशी तळमळ लागून शेवटी ते आपली पत्नी, आपले मित्र, एक स्वयंपाकी आणि एक नोकर असा सगळा गोतावळा घेऊन अक्ककोटला पोहचले.

अक्कलकोटात गेल्यावर ते गृहस्थ श्री गणपरराव जोशींच्या घरी उतरले.त्यावेळेला श्री स्वामी समर्थ हे चोळप्पाच्या घरी रहात होते.जगन्नाथराव एक श्रीफळ हाती घेऊन आपल्या सर्व मंडळीसह श्री स्वामी समर्थांच्या दर्शनाला गेले. श्री स्वामींना अनन्यभावे शरण जाऊन त्यांच्या पवित्र चरणांवर श्रीफळ अर्पण करून त्यांनी आपला माथा नमविला आणि मनातल्या मनात प्रार्थना केली, 'महाराज हे पाय चांगले करून पुन्हा जीवदान द्या किंवा ह्या देहाशी संबध तोडून मला मृत्यू द्या.' अशाप्रकारचे निर्वाणीचे विचार जगन्नाथरावांच्या मनात येत असतानाच त्यांच्या डोळ्यातून अश्रूंच्या धारा वाहण्यास सुरुवात झाली. त्या अश्रूपाताने स्वामींच्या चरणकमलावर जणूकाही अभिषेकच झाला. त्यांची ही अवस्था पाहून स्वामींच्या सभेत जेवढी मंडळी जमली होती त्या सर्वांना त्यांची खुप दया आली. स्वत: जगन्नाथराव सर्वांगाने थरथर कापू लागले आणि घामाघूम झाले. त्यांच्या घामाचा जोर एवढा होता की पायाला लावलेल्या मलमपट्टया गळून पडल्या जणूकाही त्यांच्या पायाच्या रोगाला सुध्दा श्री स्वामींच्या दर्शनाची ओढ लागली होती.त्या उघडया झालेल्या जखमांवरती श्री स्वामींची कृपादृष्टी पडली व महाराजांच्या मुखातून 'काय यातना आहे' अशी वाणी निघाली. स्वामींनी त्या ओल्या झालेल्या पटट्या फेकून द्यायची आज्ञा जगन्नाथरावांच्या बरोबर आलेल्या नोकराला दिली. त्याच जखमांवर नव्या पटट्या लावून जगन्नाथरावांना स्वामींच्या चरणांपाशी बसवले गेले. या संपूर्ण वेळात स्वामी आपल्या कृपादृष्टीने त्यांच्याकडे आणि त्यांच्या जखमांकडे पहात होते.

नंतर सेवक मंडळीची गर्दी जमू लागली हे पाहून स्वत:च्या दुखऱ्या पायांना कोणाचा धक्का लागू नये या उद्देशाने जगन्नाथराव हळूहळू अगदी मागे जाऊन बसले.त्यांच्या पत्नीने पण स्वामींच्या चरणविंदावरती माथा टेकवून अखंड सौभाग्यवती आशीर्वाद मागितला. त्यावेळी स्वामी मस्तक हलवून मुखाने काहीतरी बोलले पण ते कोणालाही स्पष्ट ऐकू आले नाही. त्यावेळी स्वामींनी आशीर्वादाचा हात वरती करून त्यांना आशीर्वाद दिला. त्यानंतरजगन्नाथराव पुन्हा एकदा

आपल्या राहत्या स्थानी आले आणि ही सारी हकीकत त्यांनी गणपतराव जोशींना सांगितली. हे ऐकून गणपतराव त्यांना म्हणाले जोपर्यंत इथे आहात तोपर्यंत दोघांनी स्वामींच्या दर्शनाला जायचं म्हणजे मग तुमचं काम झालचं म्हणून समजा.त्याप्रमाणे पुढील २१ दिवस हे दांपत्य सातत्याने स्वामींच्या दर्शनाला जात राहीले. त्यांच्या बरोबरची मंडळी त्यांच्या पायाला मुंबईहून आणलेलं मलम दररोज लावायचे.

स्वामी समर्थांना अर्पण करण्यासाठी त्यांनी मुंबईहून वेगवेगळ्या प्रकारची फळे आपल्या बरोबर आणली होती. त्यातीलचकाही फळे ते दररोज स्वामी दर्शनासाठी आले असताना स्वामींसमोर ठेवायचे.एक दिवस असेच स्वामी समोर बसले असताना त्यांच्या मनात विचार आला, हे असे कीती दिवस चालायचं.नेमक त्याचवेळेला महाराजांनी त्यांच्याकडे पाहून म्हटले की नवं औषध तयार होतयं. हे ऐकून श्रीचरणांशी नमस्कार करून जगन्नाथराव पुन्हा बिऱ्हाडी आले ते असा निर्णय करुनच की आता मुंबईहून आणलेली औषधे कुठल्याही परिस्थितीत घ्यायची नाहीत.फक्त जखमांवर पटट्या तेवढया लावायच्या.

एक दिवस सकाळच्या वेळी नोकराला बाहेर बसवुन ते शौचालयातून बाहेर येत होते त्यावेळी काही लोक त्यांना सांगायला आले की स्वामी आता मोगलाईत परत गेले आहेत.तर काही म्हणाले ते मुसलमानी दर्ग्यावर गेले आहेत. तपास केल्यावर लक्षात आले इथे ६–७ कोसांवर असलेल्या मोगलाईमधील नरगुंद नावाच्या गावात गेले आहेत. त्यांच्याबरोबर कोणीही सेवेकरी नव्हता त्यामुळे सारेच सेवेकरी त्या गावच्या दिशेने चालू लागले. त्याचवेळेलाजगन्नाथरावही आपल्या नोकराच्या पाठीवर बसून स्वामींना भेटण्यासाठी निघाले. त्यांनी पाहीले की स्वामी दर्ग्यामध्ये बसले होते.श्रींच्या हातामध्ये एक पोपट बसला होता.आणि श्री त्याला आपल्या अंगा खांद्यावर खेळवत होते.स्वामींचे हे नविन स्वरूप पाहून जगन्नाथरावत्यांच्या पायावरच कोसळले आणि स्वामींचे चरण पकडून त्यांनी खूप आक्रोश केला. स्वामींच्या चारी बाजूंना चार फकीर बसले होते. त्याशिवाय एक फकीर साफ–सफाई करत होता. जगन्नाथरावांनी रडत रडत स्वामींना विचारले देवा आता मी काय करू? ते वाक्य ऐकून स्वामी म्हणाले मालक अजून आलेला नाही. हे ऐकून जगन्नाथराव म्हणाले, देवा मी कोण आहे हेच मला माहीत नाही तर तो मालक कोण हे या अज्ञानी पामराला कस समजेल.त्यांच्या शोकाश्रूनी पुन्हा एकदा श्रींचे चरण भिजवून टाकले. ते स्वतःच्या वस्त्रांनी पुसून आपल्या बरोबर आणलेल्या चांदीच्या पादुका स्वामींच्या पायाशी ठेवल्या व म्हणाले आता मी ह्या चरणतीर्था शिवाय कुठलच औषध घेणार नाही. ह्या चरणांनी मला ताराव किंवा मारावं.असे म्हणुन त्यांनी आपले डोके स्वामींच्या पायावर ठेवले.

यावेळेला महाराजांच्या डाव्या बाजूला बसलेल्या फकीरांनी त्यांना सांगितलं तुमचं काम झाल आहे चिंता करु नका. हे ते फकीर बोलत असताना स्वामींनी जगन्नाथरावांच्या मस्तकावर हात फिरवला. श्रींचा आशीर्वाद मिळवून जगन्नाथरावांनी अतिशय आनंदाने आपल्या हातातील पादुका स्वामींच्या चरणांना लावून स्वतःच्या खिशात परत ठेवल्या. थोडया वेळाने त्यांची पत्नी ही तेथे आल्या आणि स्वामींच्या पायावर डोके ठेवून त्या खूप रडल्या. त्यांचा तो आक्रोश बाजूच्या फकीरांनाही सहन झाला नाही. त्यातील एक फकीर म्हणाला ताई तुमच्या पतीच काम झालय. हे ऐकून पुन्हा एकदा स्वामीनी त्या स्त्रीच्या डोक्यावर हात ठेऊन आशिर्वाद दिला.

पुन्हा अक्कलकोटात येऊन ही सारी कथा गणपतराव जोशींना ऐकवली आणि इथे आल्याचे सार्थक झाले असे म्हणून जगन्नाथराव भोजनानंतर वामकुक्षीसाठी पहुडले. अचानक त्यांच्या स्वप्न दृष्टांतात त्यांच्या लक्षात आलं की श्री अक्कलकोट स्वामी परत आले आहेत.जाग आल्यावर त्यांना कोणीतरी सांगितले की श्रीं स्वामी पुन्हा गावात आले आहेत.हे ऐकून जगन्नाथराव पुन्हा स्वामींच्या दर्शनाला गेले.ह्यावेळेला स्वामी जरा खूपच रागात होते.त्यामुळे त्यांना दूरूनच नमस्कार करून जगन्नाथराव थोडेसे लांबच बसले. थोड्यावेळाने सरकत सरकत श्रींच्या चरणाजवळ पोहचले आणि चरणांवर डोकं ठेवून ते पुन्हा घरी गेले. दुसऱ्या दिवशी मुंबईला जायची सर्व तयारी करून आपल्या बरोबरच्या सर्व मंडळींना घेऊन ते स्वामींच्या दर्शनासाठी आले.स्वामींकडे जाण्याची आज्ञा मागताच स्वामींनी त्वरीतच घरी जा अशी आज्ञा केली. या आज्ञेनुसार जगन्नाथराव आपल्या मंडळींना घेऊन मुंबईला जायला निघाले. रस्त्यामध्ये त्यांच्या लक्षात आले की आपली जखम आता हळूहळू सुकायला लागली आहे. घरी पोहचताच त्यांनी आपल्या मातेच दर्शन केलं आणि त्यानंतर दररोज पादुकांच तीर्थ प्राशन करून ते तीर्थ जखमांवर लावायला सुरुवात केली. हळूहळू जखमा भरत येऊन ४–५ महिन्यांमध्ये जखमा पूर्णपणे निघून गेल्या. साडेतीन वर्षांचे दुखणे स्वामींच्या दर्शनाने आणि चरण पादुकांच्या तीर्थ प्राशनाने पूर्ण बरे झाले व जगन्नाथराव स्वतःच्या पायावर चालू लागले.

(सौजन्यः श्री स्वामी स्वामी समर्थ चरित्र – कै गणेश बल्लळ मुळेकर)

(भाग ३१वा)

तेलंग स्वामी

एक अद्भुत अस्तित्व

अनुवादक – सौ. शुभदा गर्गे, नाशिक

गोस्वामीजींनी हसत हसत विचारले, "आजकाल असे गुरु मिळतात कुठे? आजकाल तर गुरु आधी शिष्याचा पगार बघतात, त्याची श्रीमंती बघतात."

तेलंग स्वामी म्हणाले, "बरोबर आहे, म्हणूनच आजकाल कोणी आपल्या कुलगुरूकडून दिक्षा घेत नाही. योग्य गुरुच्या शोधात राहतात. कुलगुरूंनी दिक्षा देणे हा व्यवसायच सुरू केला आहे.त्यांच्या ह्या कर्माने ते गुरुपदाचे नुकसान करून घेत आहेत. शिष्याचा उध्दार केला नाही तर महापाप होते. मंत्रदिक्षेनंतर गुरु–शिष्याने सहा महिने ते एक वर्ष एकत्र राहायला हवे. जेव्हा दोघांमधे सुसंवाद व्हायला लागेल तेव्हा शिष्याने गुरूकडे ज्ञानाची याचना करावी. गुरुकृपावंत होऊन तत्वज्ञानाचा उपदेश करेल. शिष्याची इच्छा नसताना गुरुने दिक्षा दिल्यास तेही महापाप होय. जोपर्यंत शिष्य हात जोडून विनंती करत नाही तोपर्यंत दिक्षा देऊ नये. दिक्षा दिल्यानंतर गुरुने शिष्याच्या प्रगतिकडे लक्ष ठेवायला हवे."

गोस्वामींनी विचारले, "असा सद्गुरु कसा ओळखावा? शिष्य तर अज्ञानी असतो ना, मग तो सद्गुरुला कसा ओळखू शकेल?"

स्वामीजी म्हणाले, "शुध्द बीज असल्याशिवाय रोपे फोफावत नाहीत, तेव्हा बीज चांगले असल्याची शहानिशा करूनच दिक्षा घ्यावी. शिष्याचे बीज सडके असल्यास त्याला शुध्द करणे हे सद्गुरुचे काम होय. गुरु सहजपणे भेटत नसतो. दिक्षा घेणे पण सोपे नाही. चांगला गुरु सहजपणे मिळत नसल्यामुळेच माणसाची दुर्दशा होत चालली आहे. कधी लहान मुले व स्त्रीयांनाही दिक्षा दिली जाते. लोकांना समजत नाही की कोणालाही दिक्षा देणे हे भयानक काम आहे. जे लोक अशा भोंदु गुरुकडून दिक्षा घेतात त्यांनाही माहित नसते. प्राचीनकाळी जसे सद्गुरु बरेच होते तसेच योग्यता असलेले शिष्यही अनेक होते. ईश्वर प्राप्तीसाठी जेव्हा तुम्ही व्याकुळ व्हाल तेव्हा देव तुमचा मदतनीस होऊन तुम्हाला योग्य गुरुपर्यंत घेऊन जाईल. गुरु मिळावा म्हणून मन आर्त होत नाही तोपर्यंत गुरु मिळत नाही. सत्शिष्य झाल्याशिवाय सद्गुरु प्राप्त होत नाही व सद्गुरु असल्याशिवाय सत्शिष्य प्राप्त होत नाही.

गोस्वामी म्हणाले, "आपण सद्गुरुचे जे वर्णन केले, असा गुरु शोधणे कसे शक्य आहे?"

तेलंग स्वामींनी काहीच उत्तर दिले नाही बरेच दिवसांनी मध्यरात्री स्वामीजी म्हणाले, "विजय, पटकन जाऊन गंगास्नान करून ये."

गोस्वामीजी बरेचदा तेलंगस्वामींकडे रात्री थांबत असत. थंडीत मध्यरात्री गंगास्नान करण्याच्या कल्पनेनेच त्यांना हुडहुडी भरली. परंतु तेलंग स्वामी म्हणाले, "माझी आज्ञा आहे, जा." गोस्वामींनी नकार देताच स्वामीजी म्हणाले, "तुला आत्ता दिक्षा द्यायची आहे."

गोस्वामी म्हणाले, "मी तुमच्याकडून दिक्षा का घेऊ? तुम्ही तर शिवलिंगावर पण लघवी करता. अशा वेडयाकडून कोण दिक्षा घेईल?"

गोस्वामीजींनी म्हटले आहे.. एकदा तेलंग स्वामी कालीमंदिरात कालीच्या मूर्तिसमोर लघवी करून, ती कमंडलूत भरून 'गंगोदकं, गंगोदकं' म्हणत कालीच्या मूर्तिवर अभिषेक करत होते.

गोस्वामींनी विचारले, "काय करता आहात?"

तेलंग स्वामी म्हणाले, "पूजा".

गोस्वामींनी विचारले, "पूजेची दक्षिणा काय?"

स्वामीजींनी उत्तर दिले, "यमालय."

गोस्वामी म्हणतात, "मी बरेचदा रात्री स्वामीजींकडेच थांबायचो. रात्री ते योगेश्वर्य दाखवित असत. एक दिवस मी त्यांना विचारले, "तुम्ही मला एवढी योगसाधना दाखवता पण माझा विश्वास बसत नाही. मला असा आशीर्वाद द्या की ह्या सर्व घटनांवर माझा विश्वास बसेल." त्यांनी स्नान करून येण्यास सांगितले.

रात्रीचा एक वाजला होता, खूप थंडी होती, मी नकार देताच मला पकडून नदीकिनारी घेऊन गेले व माझे डोके पकडून पाण्यात बुचकळू लागले. मग माझ्या डोक्यावर हात ठेऊन म्हणाले, "विश्वास बसू दे."

त्यादिवशीपासून खरोखर माझा विश्वास बसू लागला. ते म्हणाले, "तुला, मंत्र देतो." गोस्वामी म्हणाले, "मी तुमच्याकडून मंत्र घेऊ शकत नाही तुम्ही सगुणाची पूजा करता रोज १००० बिल्वपत्र व गंगाजल घेऊन शिवलिंगाची पुजा करता. मी ब्रम्होपासक असून मूर्तिपूजा मानत नाही. मी तुम्हांला गुरू करू शकत नाही."

यावर स्वामीजींनी गोस्वामींना सावलम्ब व निरावलम्ब उपासनेबद्दल सांगयला सुरुवात केली. तेलंग स्वामी म्हणाले, "नल राजाला सापाने दंश केला होता तसाच स्पर्श मी तुला करतो आहे. ह्याला एक गुढ अर्थ आहे. मी तुझा गुरू नाही. तुझा गुरु ठरलेला आहे. योग्य वेळी तेच तुला दिक्षा देतील." मग तेलंगस्वामींनी गोस्वामींच्या कानात तीन मंत्र सांगितले – एक राधा–कृष्णाचा मंत्र जो फार पूर्वी त्यांच्या आईने त्यांना सांगितला होता, दुसरा सतत जपण्याचा मंत्र म्हणजे परमेश्वराचे नाम आणि तिसरा मंत्र संकटकाळी जपण्यास सांगितले.

गोस्वामींनी विचारले, "बाबाजी मला माझा खरा गुरु कुठे मिळेल?"

तेलंगस्वामी म्हणाले, "हे समजून घेण्याची काही गरज नाही. वेळ येताच ते स्वत: येतील किंवा तुला बोलावून घेतील. कितीही प्रयत्न केलास तरी तू त्यांना शोधू शकणार नाही.त्या गुरुकडून बीजमंत्र घेतल्यावरच तुझे साधकाचे आयुष्य सुरू होईल."

गोस्वामी म्हणाले, "म्हणजे तोपर्यंत मला असेच फिरत रहावे लागेल."

तेलंगस्वामी म्हणाले, "वाट पहाणे भाग आहे. पण तोपर्यंत मी दिलेल्या मंत्रांचा जप करत रहा. लोकांना उपासना करण्याची योग्य पध्दत माहित नसल्याने त्यांना यश मिळण्यास वेळ लागतो. साधना करायची तर एकच निश्चित स्थान हवे. एक कुशासन त्यावर कंबलासन व त्यावर वस्त्रासन घालून उत्तरभिमुख बसावे. बसण्याची स्थिती अशी असावी की पाठीचा कणा ताठ असावा. पद्मासन घालून बसावे. डोळे बंद करून, भ्रूमध्यावर लक्ष केंद्रित करून, शांत मनाने गुरुने दिलेल्या बीजमंत्राचा जप करावा. सकाळ सायंकाळ दोन्ही वेळी ही क्रिया करावी. अर्ध्या तासाने सुरुवात करून हळुहळु जपाची वेळ वाढवित न्यावी.यादरम्यान मनावर काबू ठेवावा कारण मन फार चंचल असते. मला हे जमणार नाही – असे म्हणता येणार नाही कारण योगसाधना सामान्य क्रिया नव्हे.

गोस्वामीजींनी नंतर गयेच्या गुरुकडून दिक्षा घेतली. साधारण वीस एक वर्षांनंतर गोस्वामीजी तेलंगस्वामींना भेटायला काशीला आले तेव्हा त्यांना कळले की तेलंगस्वामी मौनात असतात.

गोस्वामींना पहाताच तेलंगस्वामींनी त्यांना जवळ बोलावले व त्यांच्या तळव्यावर बोटाने गिरवून विचारले, "आठवते का?"

गोस्वामीजी विनयाने उत्तरले, "हो, तुमची कृपा लक्षात आहे. तुम्ही दिलेल्या मंत्रानेच मला साधनेत यश मिळाले."

तेलंगस्वामी दिवसभर मौनात असत. आपल्या जुन्या साधक–शिष्याला भेटून त्यांना अतिशय आनंद झाला. रात्री ते गोस्वामींशी खूप गप्पा मारत.तेव्हा तेलंगस्वामींनी अजगर व्रत सुरु केले नव्हते. अजगर व्रत आचारायला सुरुवात केल्यावर मात्र त्यांनी निर्देश करणेही थांबवले.

स्वामी विवेकानंद आणि ध्यान

लेखांक ४था

आता विचार करा स्वत:च्या शरीराचा. आणि एवढे पहा कि आपले शरीर निरोगी आहे, मजबूत आहे. आपले शरीर हे आपले जीवनाचे सर्वात महत्वाचे साधन आहे. सातत्याने विश्वास ठेवा कि माझे शरीर सुदृढ आहे आणि त्याच्याच मदतीने मी ह्या भवसागराच्या पार जाईन. दुबळ्यांना स्वातंत्र्याचाही अधिकार नाही. म्हणूनच दुबळेपणा फेकून द्या. तुमच्या शरीराला सांगा कि ते किती मजबूत आहे, तुमच्या मनालाही सांगा कि ते किती मजबूत आहे आणि स्वत:च्या आत्म्याशी दृढ श्रद्धा आणि निरंतर आशा ह्या पाशांनी बांधून घ्या.

ध्यानाची काही उदाहरणे:

कल्पना करा तुमच्या डोक्याच्या वरती काही इंचांवर एकछानसे कमळ आहे ज्याच्या मध्यभागी सद्‌गुणांचे केंद्र आहे आणि त्याला ज्ञान तंतूचा बनलेला देठ आहे. त्या कमळाच्या ८ पाकळ्या म्हणजे योग्याच्या ८ सिद्धी आहेत. त्याच्या पुंकेसरांमध्ये वैराग्य आहे. जर योग्याने आपल्या बाह्य सामर्थ्याला नाकारले तर तो मोक्षाला प्राप्त होतो. ह्याचाच अर्थ कि अष्टसिद्धींचे वरदान असूनही त्या सिद्धींचे दमन करण्या एवढे कडक आणि पूर्ण वैराग्य योग्याला आंतरिक असते. आता कल्पना करा कि, त्या कमळच्या मधोमध एक सुवर्णाचे अस्तित्व आहे जे स्थूलाच्याही पलिकडचे आहे. त्याचे नाव ॐ परंतु ते अवर्णनिय आहे. त्याच्या चारहि बाजूला एक उत्स्फुर्त प्रकाश आहे त्यावर ध्यान करा.

आणखी एक ध्यान विषेश करून करा.

कल्पना करा कि आपल्या हृदयाकाशामध्ये एक सुंदर सोनेरी रंगाची ज्योत जळत आहे. कल्पना करा कि हि ज्योत म्हणजे तुमच्याच आत्म्याचे प्रकाशमय स्वरूप आहे आणि त्या ज्योतिच्या गर्भामध्ये आणखी एक दिव्य प्रकाश दिसतो आहे. हा तर आपल्या आत्म्याचा हि आत्मा म्हणजे परमात्मा होय. त्याच्यावर ध्यान करा.

आपल्या धेयापर्यंत कसे पोहोचाल?

आपले जिवंत रहाणे किंवा मरणे ह्याचा आयुष्याशी काहीच संबंध नाही. आपल्या ध्येयामध्ये झोकून द्यायचे आणि निष्काम भावाने काम करीत रहायचे. तुम्ही जर शूर असाल तर केवळ सहा महिन्यातच तुम्ही एक आदर्श योगी बनाल. परंतु झोकून न देता सगळीकडेच पाय ठेवत जर वेगवेगळ्या मार्गांचा शोध कराल तर हाती काहीच गवसणार नाही मग साधनेतली प्रगती खुंटली. मग कितीही पुस्तके वाचा अथवा अभ्यास करा, काहीच फरक पडत नाही.

यशस्वी होण्यासाठी प्रचंड लवचिकपणा आणि प्रचंड आत्मविश्वास हवा. **"मी समुद्रही पिऊन टाकीन आणि माझ्या इच्छेनुसार मी डोंगरही हलवू शकेन."** असे तो स्वयंभू आत्मा म्हणतो. तशा प्रकारची ऊर्जा तयार करा, अशा प्रकारची श्रद्धा ठेवा, अशीच मेहनत करा अन मगच तुम्ही त्या तुमच्या ध्येयापर्यंत पोहोचाल.

आश्रम वार्ता

(१) ऑनलाईन ज्ञानोत्सवः

कॉरॉना व्हायरसने माजवलेल्या धुमाकुळीमध्ये गेले दोन महिने सगळे जगच जणू बंद पडले होते. मानवी इतिहासात एवढ्या मोठ्या प्रमाणात प्रभाव करणारी ही अलौकीक घटना होती. सगळे व्यवहार ठप्प झाले आणि प्रत्येक माणसाला आपल्या सगळ्या कामाधामाला बाजूला सारून घरातच बसावे लागले खरे. सामान्य माणुस ह्या जीवनाला विटून गेला असताना रेकि विद्या निकेतनचे रेकि साधक मात्र गुरुजींनी दिलेल्या दैनंदिन कार्यक्रमात डुंबुन गेले होते. आला दिवस कसा आनंदात जायचा ह्याचे भानच नव्हते त्यांना. त्यातच रेकि विद्या निकेतनतर्फे २६ मार्च पासून नित्य नियमाने झूम मिटींग प्लॅटफॉर्मवर साधना सप्ताह सुरू झाले. सकारात्मकतेचे सामर्थ्य ह्या सात दिवसांच्या शिबिराने ह्या ज्ञान यज्ञाचा शुभारंभ झाला. त्यानंतर त्याला लागूनच चक्रे– मानवी जीवनाची चाके, त्यानंतर मन आणि स्वास्थ्य उपचार असे घडाक्याने एकेक सप्ताह पार पडले आणि जगभरातील आपले साधक नुसते साधनेच्या प्रवाहात वाहून गेले. गुरूजींच्या ह्या धडाकेबाज सप्ताहांनंतर रेकि शिक्षक श्री राकेश कुमार आणि श्री विशाल श्रीधनकर यांनीही सहा दिवसांचा "गेटवे ऑफ लाईट" (प्रकाशाचा मार्ग) हा प्रशिक्षण वर्ग साधकांसाठी केला. त्यानंतरच्या आठवड्यात गुरूजींनी एका आठवड्याचे "ध्यान शिबिर" आयोजित केले ज्यात सात प्रकारची ध्याने आणि त्यांच्यावरचे सत्संग पार पडले.



(२) श्री गुरूचरित्र अध्याय विवेचनः

एप्रिल महिन्याच्या अखेरच्या आठवड्यापासून दर गुरूवारी ऑन–लाईन आंतर्राष्ट्रीय श्री गुरुचरित्र अध्याय विवेचन वर्ग गुरूजींनी सुरू केले आणि त्या उपक्रमाला साधकांनी प्रचंड प्रतिसाद दिला. आतापर्यंत दहा अध्यायांचे विवेचन होऊन पुढील विवेचन वर्गांची दत्तभक्त आतुरतेने वाट पाहत आहेत.



(३) देवरूख स्पिरीट्युअल प्रॉवेसची ऑनलाईन शिबिरे:

लॉकडाऊन लांबल्यामुळे देवरूख स्पिरीट्युअल प्रॉवेसची एप्रिल आणि मे महिन्यांतील वेगवेगळ्या ठिकाणी ठरवलेली शिबिरे प्रत्यक्षात होणे शक्य झाले नाही. परंतु यातून नाऊमेद न होता, ह्या संस्थेने २१ एप्रिल पासून अगदी २९ मे पर्यंत सॉफ्ट १, सॉफ्ट २, सॉफ्ट ३, स्ट्रॉंग –१ तसेच मध्यम मार्ग १ व २ अशी प्रत्येकी १० दिवसांची सहा शिबिरे ह्या उन्हाळ्यात भरवली. ह्या सर्वच कार्यक्रमांना प्रचंड प्रतिसाद मिळाला व साधारण दीडशे विद्यार्थ्यांनी ह्या शिबिरांचा लाभ घेतला. नव्या पिढीतून नव्या सात्विक जगाची उभारणी करायची ह्या संस्थेच्या उद्देशाला या शिबिरांमुळे बळ मिळाले आहे हे नि:संशय.

पक्षी आणि झाडाची फांदी..

नुकतेच वाचले कि झाडाची फांदी कितीहि नाजूक असली तरीही त्यावर बसायला पक्षी घाबरत नाही कारण त्याला आपल्या पंखांवर विश्वास असतो. साधकांचेही असेच असायला हवे. कोठल्याही परिस्थितित आपल्यातील आंतरिक सामर्थ्याची ज्याला जाण असेल त्याने परिस्थितीला का घाबरावे? पक्ष्यांना जसे पंख तसेच मानवाला देवाने मन दिले आहे. या मनाचे सामर्थ्य पक्ष्यांच्या पंखांपेक्षाही खूप जास्त आहे. जेथे पक्ष्यांचे पंख थकतील किंवा पोहोचू शकत नाहीत तिथे मानवी मनाचा संचार लीलया चालतो. गरूडासारख्या किंवा त्याच्यापेक्षाही उंचावर भराऱ्या मारायला मनाला सहज जमते. फक्त त्या मनावर संयम मात्र पाहीजे. पक्ष्याला जर आपल्या पंखांची आठवण राहिली नाही तर तोही फांदीवर बसायला तयार होणार नाही. प्रत्येक झाडावरची प्रत्येक फांदी त्याच्या मनात भीति तयार करेल. तसेच मानवाचे. आपल्या मनाचे पंख आहेत आणि त्यांच्यातील सामर्थ्य अफाट आहे हे ज्या साधकाला कळले कि मग त्याची साधना सफल झाली.